महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीची पुनर्रचना.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन आदेश क्र.आरपीए-२०१७/प्र.क्र २५८/र-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २७ एप्रिल, २०१८.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.एलक्यूएन.१२/२०१३/प्र.क्र. १९०/अ-२, दिनांक २७/८/२०१४

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीए-२०१५/प्र.क्र.१९४/र-१, दि.२०/०८/२०१५,

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीए-२०१७/प्र.क्र.२००/र-१, दि.२४/१०/२०१७.

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासनाचा The Right to fair compensation and Transparency in land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, २०१३ हा नवीन कायदा दिनांक १/१/२०१४ पासून अंमलात आलेला असून या कायद्यातील १०९ कलमान्वये महाराष्ट्र शासनाने नियम तयार केले आहेत. सदर नियम महसूल व वन विभाग क्र.एलक्यूएन.१२/२०१३/प्र.क्र.१९०/अ-२, दिनांक २७/८/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत. राज्यामध्ये महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ हा दिनांक १ एप्रिल, २००२ पासून अंमलात आलेला आहे. केंद्र शासनाने फेब्रुवारी, २००४ मध्ये राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००३ जाहीर केले. या धोरणानुसार राज्य शासनाचे पुनर्वसन धोरण केंद्राने जाहीर केलेल्या पुनर्वसन धोरणाशी सुसंगत असण्याच्या उद्देशाने राज्याच्या पुनर्वसन धोरणात आवश्यक ते बदल करुन त्याची अंमलबजावणी करण्याकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : आरपीए -२००६/प्र.क्र.१(१)/र-१, दिनांक १७/३/२००६ अन्वये महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण या नावाने मा. मंत्री (पुनर्वसन) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण ही कायमस्वरुपी यंत्रणा निर्माण करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००७ राज्यात लागू करण्यात आले व आता भूमीसंपादन/पुनर्वसन व पुनर्स्थापना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ दिनांक १ जानेवारी, २०१४ पासून अंमलात आलेला आहे. शासन निर्णय, दिनांक १७/३/२००६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाचे पुर्नगठन दि.१३/०३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आले आहे. भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ५० पोटकलम-१ महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीची स्थापना शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीए-२०१५/प्र.क्र.१९४/र-१, दि.२०.०८.२०१५, तसेच राज्य सनियंत्रण समितीची स्थापना शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीए-२०१७/प्र.क्र. २००/र-१, दि.२४.१०.२०१७ अन्वये करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण, संनियंत्रण समिती व राज्य संनियंत्रण समितीचे एकत्रिकरण करुन भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ५० पोटकलम-१ नुसार महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीची पुनर्रचना करण्याची बाब प्रस्तुत नस्तीवर विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण, संनियंत्रण समिती व राज्य संनियंत्रण समितीचे एकत्रिकरण करुन भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ५० पोटकलम-१ नुसार महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समिती स्थापना करणे तसेच सदर समितीवर उपाध्यक्ष पदाची निर्मिती करणे तसेच सदर उपाध्यक्ष पदाला मंत्री दर्जा देणे, अनुषंगिक लाभ/सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीए-१०१४/प्र.क्र.३७२/र-१, दि.१३.०३.२०१५, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीए-२०१५/प्र.क्र.१९४/र-१, दि.२०.०८.२०१५, तसेच शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आरपीए-२०१७/प्र.क्र. २००/र-१, दि.२४.१०.२०१७ अधिक्रमित करण्यात येत आहेत.

भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ५० पोटकलम-१ अनुसार या अधिनियमाखाली पुनर्वसन व पुनर्स्थापना योजनांच्या आराखड्याच्या अंमलबजावणीचे पुनर्निरीक्षण व संनियंत्रण करण्यासाठी “महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समिती” या समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील :-

अध्यक्ष :- मा. मंत्री (मदत व पुनर्वसन)
उपाध्यक्ष :- शासन नियुक्त (मंत्री दर्जा)
सदस्य:- मा. मंत्री (महसूल)
मा. मंत्री (जलसंपदा)
मा. मंत्री (वित्त)
मा. मंत्री (उद्योग)
मा. मंत्री (ऊर्जा)
मा. मंत्री (वने)

मा.मंत्री (प्राधिकरणाचे सदस्य) यांना आवश्यकता भासल्यास ते त्यांच्या विभागाच्या सचिवांना महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या बैठकीस हजर राहण्यास प्राधिकृत करु शकतील.

निमंत्रित प्रधान सचिव/ सचिव :- सचिव (वने - भूसंपादन कक्ष)
प्रधान सचिव (महसूल)
प्रधान सचिव (जलसंपदा)
सचिव (ऊउर्जा)
सचिव (उद्योग)
सचिव (व्यय), वित्त विभाग
सचिव (ला.क्षे.वि.),जलसंपदा विभाग.

ज्या विभागाशी संबंधित प्रकल्पाचा आराखडा मंजूरीसाठी संनियंत्रण समितीच्या बैठकीत ठेवलेला असे त्या-त्या बैठकीपुरते संबंधित विभागाचे सचिव, निमंत्रित प्रधान सचिव/सचिव असतील.

संनियंत्रण समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी :- अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग

अशासकीय निमंत्रित सदस्य :- राज्याच्या प्रत्येक महसूली विभागातील एक याप्रमाणे सहा विभागातील सहा अशासकीय व्यक्तींना महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीवर "निमंत्रित सदस्य" म्हणून नेमण्यात येईल. त्यांच्या नेमणूकीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

तसेच पुनर्वसन व पुनस्थापना या क्षेत्रातील तज्ञ असलेल्या दोन अशासकीय व्यक्तींना समितीवर "निमंत्रित सदस्य" म्हणून नेमण्यात येईल. त्यांच्या नेमणुकीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीचे अधिकार :-

१. राज्य शासनाचा विभाग/अंगीकृत उपक्रम महामंडळ अथवा केंद्र शासनाचा विभाग/ अंगीकृत उपक्रम महामंडळ अथवा अन्य कोणत्याही सरकारी/निमसरकारी संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था यांनी हाती घेतलेल्या प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाची कामे संनियंत्रण समितीमार्फत करण्यात येतील. यासाठी संबंधित प्रकल्प संस्थेकडून आवश्यक ती आर्थिक तरतूद उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समिती व संबंधित प्रकल्प संस्था यांच्यामध्ये करार करण्यात येईल.

२. पुनर्वसनाच्या कामाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेणे, पुनर्वसनासंबंधीचे नियम तयार करणे.

३. एखाद्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाचे काम संनियंत्रण समितीच्या यंत्रणेमार्फत करणे किंवा शासनाच्या अन्य संबंधित विभागाच्या यंत्रणेमार्फत करणे किंवा आवश्यकतेप्रमाणे नियमानुसार खाजगी यंत्रणेचा सहभाग घेणे याबाबतचे अंतिम आर्थिक तथा प्रशासकीय निर्णय घेणे, संबंधित यंत्रणेला निर्देश देणे व घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे.

४. ज्या संस्थेने/विभागाने प्रकल्प हाती घेतलेला आहे, त्यांच्याशी करार करुन त्या प्रकलपामुळे बाधित झालेल्या व्यक्तींना पुनर्वसनाच्या कामाची जबाबदारी पुनर्वसन संनियंत्रण समिती स्वत:कडे घेईल. संनियंत्रण समिती त्यांच्या नियंत्रणाखालील पुनर्वसन यंत्रणेमार्फत पुनर्वसनाची आवश्यक कामे पार पाडेल.

महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीचे कार्ये :-

१. पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व संनियंत्रण करणे.

२. पुनर्स्थापना आयुक्ताने भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ च्या कलम १८ अन्वये मान्यता दिलेल्या पुनर्वसन व पुनस्थापना योजनेच्या प्रसिध्दीपासून एका महिन्याच्या आत बैठक घेणे, इत्यादी बाबींच्या अनुषंगाने विहीत कार्यवाही करणे.

महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या नियंत्रणाखालील पुनर्वसन यंत्रणा :

महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीची संपूर्ण पुनर्वसन यंत्रणा ही महसूल विभागाचा एक भाग म्हणून कार्यरत असेल. त्याबाबतचे यापूर्वी निर्गमित केलेले आदेश यापुढेही तसेच कार्यान्वित राहतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२७१६१५५०६८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f113316b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2018.04.27 16:20:48 +05'30'

(दयानंद शं. मुंजाळे)
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
११) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
१२) सर्व विभागीय आयुक्त,
१३) सर्व पाटबंधारे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक,
१४) सर्व जिल्हाधिकारी,
१५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.
१६) सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
१७) सर्व कार्यासन (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) जलसंपदा विभाग (५ प्रतींसह), मंत्रालय, मुंबई,
१९) निवड नस्ती, कार्यासन र-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय. मुंबई.